| | | | | |
|---|---|---|---|---|
| सत्यमेव जयते | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव | **महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग**<br>**राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय**<br>**उरो रुग्णालय तिसरा मजला औंध** | | G20 |


**उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजीआ)**
**तथा उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यू**
**महाराष्ट्र राज्य पुणे**

संकेतस्थळ : arogya.maharashtra.gov.in
कार्यालय : ०२० — २६०५००२६
नानोप विभाग : ०२० — २६०५८७४७
कायदा विभाग : ०२० — २६०५००२७
इमेल :- crs_d83@yahoo.com
crslegalcell@gamil.com


आरोग्य सेवा

जा.क्र.आमाजीआ/कक्ष-८३/कायदा विभाग/२०२६/२०९/उसतोड का. आ.ज. मृ. नोंदी/10749-930/२०२६
दिनांक:- 16/ 09 /२०२६

प्रति,
जिल्हा आरोग्य अधिकारी,
तथा जिल्हा निबंधक,
जन्म-मृत्यु . . . . (सर्व).

विषय:- उसतोड कामगारांच्या आपत्यांची जन्म मृत्यूंच्या नोंदी बाबत तसेच गर्भवती महिलांची प्रसूती जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात होणेबाबत.

संदर्भ :- १) मा. आमदार, साक्री विधानसभा, मा. मंजुळाताई तुळशिराम गावित यांचे पत्र जा. क्र.साविस/स्विस/५५४/२०२६ दि. २९/०६/२०२६.
२) सार्वजनिक आरोग्य विभाग यांची दि. १२/०४/२०१८ रोजीची अधिसूचना.
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दि ३१ जुलै २०२६ रोजीची अधिसूचना.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भीय पत्रान्वये परराज्यातील बरेचसे उसतोड कामगार हे सहकुटुंब साखर कारखान्यांच्या गावी उसतोड हंगामात जात असतात व ते कारखाना साईटवर तात्पुरत्या स्वरुपाच्या वास्तव्यास असतात. गर्भवती महिलांची प्रसुती तात्पुरत्या स्वरुपात वास्तव्यास असलेल्या ठिकाणी होत असते. व त्यांना तेथे आरोग्य सेवा उपलब्ध होत नाही तसेच त्यांच्या आपत्याची जन्माची किंवा मृत्युची नोंद केली जात नाही. उसतोडीचा हंगाम संपल्यावर हे कामगार त्यांच्या मुळगावी गेल्यानंतर त्यांना झालेल्या आपत्याची नोंद कागदपत्रांच्या अभावी त्यांच्या गावी होत नाही. असे आढळून आले आहे. तसेच हा समाज फारसा शिकलेला नसल्याने नोंद करणे टाळत असतात. यासोबत परराज्यातील उसतोड कामगारांच्या आपत्यांची जन्म मृत्युच्या नोंदी बाबत तसेच गर्भवती महिलांची प्रसुती जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात होणेबाबत धोरण राबविण्यात यावे कारखाना साईटच्या लगत असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्र / आरोग्य उपकेंद्र किंवा ग्रामिण रुग्णालयात गर्भवती महिलांना आरोग्यविषयक सेवा पुरविण्यात यावी तसेच त्यांच्या आपत्यांची जन्म मृत्युच्या नोंद देखील घेण्यात यावी हि विनंती.

त्यानुसार महाराष्ट्र राज्यामध्ये जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ व सुधारित अधिनियम २०२३, २०२६ तसेच महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी नियम २००० व सुधारित नियम २०२६ नुसार जन्म व मृत्यू



Scanned with OKEN Scanner

घटनांची नोदणी केंद्र शासनाने विकसित केलेल्या संगणक प्रणालीद्वारे (CRS पोर्टल) करण्यात येते दि. १२/०४/२०१८ च्या अधिसूचनेनुसार वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, व वैद्यकीय अधीक्षक ग्रामीण रुग्णालय यांना निबंधक जन्म मृत्यू म्हणून घोषित करण्यात आले आहे. तसेच ग्रामीण भागात व शहरी भागामध्ये पण निबंधक कार्यरत आहेत.

उसतोड कामगार ज्या निबंधकाच्या कार्यक्षेत्रात कामास आले आहेत त्या कार्यक्षेत्रातील जन्म घटनेची नोंद निबंधकांनी घ्यावी यासाठी आरोग्य सेवक आरोग्य सेविका / पोलीस पाटील ग्रामपंचायत कर्मचारी कुटुंब प्रमुख यांनी कलम ८ मधील (क) (ख) (ग) (घ) (च) व कलम ९ नुसार जाबाबदार व्यक्ती यांनी गरोदर माता प्रसूती झाल्यावर २१ दिवसाच्या आत माहिती निबंधकांना द्यावी व नमुना क्र. १ जन्म अहवाल भरून निबंधकाने ओळखपत्राची ३ ते ४ आवशयक कागदपत्रे घेऊन जन्म प्रमाणपत्र त्वरित अदा करावे.

याबाबत आपल्या अधिनस्त सर्व शासकीय संस्था व निबंधकांना सूचित करण्यात यावे. केलेल्या कार्यवाहीबाबत या कार्यालयास अवगत करण्यात यावे.

(डॉ. बी. एस. कमलापूरकर)
उपसंचालक आरोग्य सेवा, (आमाजीआ) पुणे,
तथा उपमुख्य निबंधक, जन्म व मृत्यू,
महाराष्ट्र राज्य.

प्रत माहितीस्तव सादर :- मा. कक्ष अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई.
प्रत आवश्यक त्या कार्यवाहीस्तव सादर :-
१) उपसंचालक, आरोग्य सेवा,परिमंडळे ........ (सर्व)
२) वैद्यकीय आरोग्य अधिकारी, तथा निबंधक जन्म-मृत्यु, महानगरपालिका......... (सर्व)
३) जिल्हा शल्य चिकित्सक,जिल्हा रुग्णालय................... (सर्व)

प्रत माहितीस्तव सादर:- १) मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई.
२) मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
३) मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभाग, मुंबई.
४) मा. आयुक्त, महानगरपालिका, (सर्व).........
५) मा. जिल्हाधिकारी, (सर्व).........
६) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, (सर्व).........
७) मा. संचालक (रुग्णालय), आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई.
८) मा. संचालक, (प्राथमिक), आरोग्य सेवा पुणे, तथा मुख्य निबंधक, जन्म मृत्यू, महाराष्ट्र राज्य.



Scanned with OKEN Scanner